सत्यमेव जयते

## महाराष्ट्र शासन
## तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
मॉडेल कॉलनी , बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे -४११०१६

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा. क्र : तंशिविकापु/महाडीबीटी/२०२४/ 3618 दिनांक : 02 SEP 2024

**परिपत्रक-**

**प्रति,**

प्राचार्य/संचालक,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त,
सर्व संस्था, पुणे विभाग.

**विषय : भारत सरकार शिष्यवृत्ती महाविद्यालय प्रवेश फी बाबत.**

संदर्भ — १. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प मध्यवर्ती प्रशासकीय इमारत जुन्नर रोड,घोडेगांव, ता.आंबेगाव, जि. पुणे.
२. शासन निर्णय आविवि क्र.शिष्यवृ-२०२१/प्र.क्र.९०/का.१२ दिनांक-१७/०१/२०२२
३. स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया एस.एफ.आय यांचे दि.०५.०६.२०२४रोजीचे निवेदन पत्र

उपरोक्त विषयास अनुसरुन, संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व संस्थांना कळविण्यात येते की, संदर्भ क्र.०२ च्या शासन निर्णयान्वये सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून अनुसुचित जमातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेचा लाभ महाडिबीटीं पोर्टलवरून अदा करण्यात येत असून सदर योजनेसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना महाडिबीटी पोर्टलवरून त्यांच्या आधार लिंक बँक खात्यात जमा करण्यात येते.

तथापी अनुसुचित जमातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत शैक्षणिक लाभ महाडिबीटी प्रणालाद्वारे अदायगीसाठी इतर शुल्काच्या १६ बाबी पुढीलप्रमाणे असुन १. प्रवेश फी (अनुदानित/विनाअनुदानित),२. प्रयोगशाळा शुल्क, ३. ग्रंथालय शुल्क, ४. जिमखाना शुल्क ५. विविध गुणदर्शन/उपक्रम शुल्क, ६. महाविद्यालय मासिक शुल्क, ७. संगणक प्रशिक्षण शुल्क, ८. नोंदणी शुल्क, ९. विद्यापीठ विकास निधी, १०. विद्यापीठ क्रिडा निधी, ११. विद्यापीठ अश्वमेध निधी, १२. विद्यापीठ वैद्यकीय मदत निधी, १३. विद्यापीठ विद्यार्थी सहाय्य निधी, १४. विद्यापीठ विद्यार्थी विमा निधी, १५. युथ फेस्टिवल निधी, १६. विद्यार्थी ओळखपत्र याबाबीचे शुल्क शासनामार्फत महाविद्यालयांना अदा करण्यात येते.

**संदर्भ क्र.२ मधील शासन निर्णयातील परिशिष्ट क्रमांक ६ मधील मुद्दा क्र.१२ अन्वये विद्यापीठ/शैक्षणिक संस्था/महाविद्यालय तंत्रनिकेतन यांनी संबंधित अनुसुचित जमातीच्या विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्काची कोणतेही रक्कम आकारू नये तसेच कोणत्याही अनुसुचित जमातीच्या विद्यार्थ्यांची पिळवणूक होणार नाही. याची योग्य ती दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित शैक्षणिक संस्थाची असेल विद्यार्थ्यांची पिळवणूक झाल्यास तसेच विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची फी आकारल्यास किंवा वसूल केल्यास संबंधित शैक्षणिक संस्था/महाविद्यालय यांच्या विरूद्ध फौजदारी स्वरूपाची कार्यवाही करण्यात येईल असे उक्त शासन निर्णयात नमूद आहे.** तरी सर्व संस्थांनी याबाबत योग्य ती दक्षता घ्यावयाची आहे.

सोबत- संदर्भिय पत्र

(डॉ. द. व्यं. जाधव )
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे.

प्रत- प्रोग्रामर, तं.वि.का. पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

महाराष्ट्र शासन

# प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवसी विकास प्रकल्प
## मध्यवर्ती प्रशासकीय इमारत जुन्नर रोड,
## घोडेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे.

दुरध्वनी क्र. (०२१३३) २४४२६६ E Mail- poitdp.ghodegaon-mh@gov.in

जा.क्र. भासशि-२०२४-२५ प्र.क्र/का.३(४) ५०६३ घोडेगाव दिनांक ०२/०८/२०२४

प्रति,

मा. उपसंचालक,
उच्च व तंत्रशिक्षण
विभाग पुणे - शिवाजीनगर पुणे. ४११०१६

विषय:- भारत सरकार शिष्यवृत्ती महाविद्यालय प्रवेश फी बाबत...

संदर्भ :-१. शासन निर्णय आविवि क्र शिष्यवृ-२०२१/प्र.क्र.९०/का.१२ दिनांक १७/०१/२०२२

२.स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया एस.एफ.आय यांचे दिनांक ०५/०६/२०२४ रोजीचे प्राप्त निवेदन पत्र.

३.या कार्यालयाचे जा.क्र.भासशि २०२३-२४प्र.क्र./का.३(४) १६७३ दि.१८/०३/२०२४चे पत्र.

४. या कार्यालयाचे जा.क्र.भासशि २०२३-२४प्र.क्र./का.३(४) ३१४८ दि.२८/०६/२०२४चे पत्र.

महोदय,

उपरोक्त संदर्भ क्रमांक १ अन्वये सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासुन अनुसुचित जमातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेचा लाभ महाडिबीटी पोर्टलवरुन अदा करण्यात येत असून सदर योजनेसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना महाडिबीटी पोर्टलवरुन त्यांच्या आधार लिंक बॅक खात्यात जमा करण्यात येते.

तथापी अनुसुचित जमातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत शैक्षणिक लाभ महाडिबीटी प्रणालीव्दारे अदायगीसाठी इतर शुल्काच्या १६बाबी पुढीलप्रमाणे असुन १.प्रवेश फी (अनुदानित /विनाअनुदानित),२.प्रयोगशाळा शुल्क,३.ग्रथांलय शुल्क,४.जिमखाना शुल्क, ५.विविध गुणदर्शन /उपक्रम शुल्क, ६.महाविद्यालय मासिक शुल्क, ७.संगणक प्रशिक्षण शुल्क,८.नोंदणी शुल्क, ९.विद्यापीठ विकास निधी, १०.विद्यापीठ क्रिडा निधी,११.विद्यापीठ अश्वमेध निधी, १२. विद्यापीठ वैद्यकीय मदत निधी, १३.विद्यापीठ विद्यार्थी सहाय्य निधी,१४. विद्यापीठ विद्यार्थी विमा निधी, १५.युथ फेस्टिवल निधी, १६. विद्यार्थी ओळखपत्र याबाबीचे शुल्क शासनमार्फत महाविद्यालयांना अदा करण्यात येते.

संदर्भ क्रमांक १ मधील शासन निर्णयातील परिशिष्ट क्रमांक ६ मधील मुद्दा क्रमांक १२ अन्वये विद्यापिठ/ शैक्षणिक संस्था/ महाविद्यालय तंत्रनिकेतन यांनी संबधित अनुसुचित जमातीच्या विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी शिक्षण

२६.०८
२

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
28 AUG 2024
आवक क्र. ७३३५

शुल्काची कोणतेही रक्कम आकारू नये तसेच कोणत्याही अनुसुचित जमातीच्या विद्यार्थ्यांची पिळवणूक होणार नाही. याची योग्य ती दक्षता घेण्याची जबाबदारी संबधित शैक्षणिक संस्थाची असेल विद्यार्थ्यांची पिळवणूक झाल्यास तसेच विद्यार्थ्याकडून कोणत्याही प्रकारची फी आकारल्यास किंवा वसूल केल्यास संबधित शैक्षणिक संस्था / महाविद्यालय यांच्या विरूद्ध फौजदारी स्वरूपाची कार्यवाही करण्यात येईल असे उक्त शासन निर्णयात नमूद आहे.

त्याअनुषंगाने संदर्भ क्र. २ अन्वये स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया एस.एफ.आय यांचे दिनांक ०५/०६/२०२४ रोजीचे निवेदन प्राप्त झाले असुन त्यामध्ये विद्यार्थ्यांनाकडुन उक्त १६ बाबीचे शुल्क महाविद्यालयाकडुन आकारण्यात येत असल्याबाबत तक्रारी सदर निवेदनातुन करण्यात आलेल्या आहेत.

या कार्यालयमार्फत अधिनस्त असलेल्या महाविद्यालयास संदर्भ क्र ३ व ४ अन्वये याबाबत निर्देश दिले असुनसुध्दा महाविद्यालयाकडुन फी आकारण्यात येत असलेबाबतच्या स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया या विद्यार्थ्यांनकडुन प्राप्त तक्रारी या कार्यालयास प्राप्त झालेल्या आहेत.तरी आपल्या अधिनस्त असलेल्या महाविद्यालयांना याबाबत उक्त संदर्भ क्रमांक १ अन्वये योग्य ती अमंलबजावणी करून अनुसुचित जमातीच्या विद्यार्थ्यांची फी न आकारण्याबाबत आपल्यास्तरावरून योग्य ते आदेश व्हावे.

याबाबत तत्काळ कार्यावाही करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास अवगत करण्यात यावा.

आपला विश्वासू

(संदिप पाटील)
प्रकल्प अधिकारी
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
घोडेगाव ता.आंबेगाव जि.पुणे

प्रत

संबधित महाविद्यालय प्राचार्य पुणे.